**कौ.हिं.महिलांचे संरक्षण अर्ज क्र. ७१/२०२३ निशाणी क्र. सोबत**

**<u>अर्जदाराचा सरतपास शपथेवर अर्जदारातर्फे श्रीमती. नेहा वाघ विधीज्ञ</u>**

शपथपत्रातील मजकूर मी वाचून पाहिला. तो माझे सांगणेप्रमाणे लिहिलेला असुन त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. मी न्यायालयात डॉ. भुषण मुरके यांचे दवाखान्यात केलेल्या माझे व जाबदेणार क्र. १ यांचे तपासणीचे वैद्यकीय रिपोर्ट दाखल केले आहेत. त्यावर वैद्यकीय अधिकारी डॉ. मुरके यांची सही आहे. त्यातील लिहिलेला मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल–अ** देण्यात येते. मी अभिलेखावर लॅपक्रॉपचे माझे तपासणीचे रिपोर्ट दाखल केलेले आहेत. सदर तपासणी मी जाबदेणार यांचे सांगणेवरुन करुन घेतल्या होत्या. त्यावर संबंधीत तज्ञांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल–ब** देण्यात येते. मी अभिलेखावर जाबदेणार क्र. १ यांनी मला त्यांचे वकिल स्नेहल टापरे यांचे मार्फत मला पोस्टाने पाठविलेली नोटीसची छायांकीत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर नोटीसला जाबदेणार यांचे विधीज्ञांनी मान्य केल्याने त्यास **निशाणी क्र. पी–१** देण्यात येते. त्यातील माझ्यावर केलेले आरोप खोटे आहेत. मी अभिलेखावर मी दि. ०८/०९/२०२३ रोजी सदर नोटीसचे उत्तर जाबदेणार क्र. १ यास ई–मेल द्वारे पाठविले होते. त्याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर नोटीसी उत्तराची प्रत जाबदेणार यांनी मान्य केल्यास त्यास **निशाणी क्र. पी–२** देण्यात येते. मी दि. २१/०९/२०२३ रोजी जाबदेणार क्र. १ यांनी मला ई–मेल पाठविलेल्या उत्तराची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास जाबदेणार यांचे विधीज्ञ यांनी मान्य केल्यास त्यास निशाणी क्र. पी–३ देण्यात येते. मी वेगवेगळया कंपनीमध्ये नोकरीसाठी निवेदन केले होते. त्यांनी मला नोकरी देण्यास ई–मेल द्वारे नकार दिला होता. त्याबाबतचे एकूण चार ई–मेल मी अभिलेखावर दाखल केले आहेत. त्यांना अनुक्रमे आर्टीकल 'क' ते 'ई' देण्यात येते. मी अभिलेखावर भारतीय पुरावा कायदा कलम ६५–ब अंतर्गत प्रमाणपत्र मी अभिलेखावर दाखल केलेल्या ई–मेलच्या संदर्भात दाखल केले आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास जाबदेणार तर्फे विधिज्ञ श्रीमती. विशाखा गायकवाड**

जाबदेणार यांनी तहकूबीचा अर्ज दाखल केला.  सबब, अर्ज जाबदेणार यांचे तहकूबीच्या अर्जावर पारीत केलेल्या आदेशानुसार उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करणेत आला.

| श्रवणोत्तर स्विकृत | समक्ष |
|---|---|
| MAIMUNA SULTANA MOINUDDIN Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN Date: 2025.08.20 15:39:25 +0530 | MAIMUNA SULTANA MOINUDDIN Digitally signed by MAIMUNA SULTANA MOINUDDIN Date: 2025.08.20 15:39:31 +0530 |
| (कु.मैमुना सुल्ताना एम.) | (कु.मैमुना सुल्ताना एम.) |
| प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खडकी |
| दि. २०/०८/२०२५ | दि. २०/०८/२०२५ |